

# ११ गोष्ट : लबाड कोल्हा




एकदा कोल्होबाला खूप तहान लागली. उन्हाळ्याचे दिवस असल्याने जंगलातील ओढे, नाले आटून गेले. कोल्हा तहानेने व्याकूळ होऊन सगळीकडे पाणी शोधत धावत सुटला तेव्हा त्याला एक विहीर दिसली. विहिरीत पाणी पाहून त्याला खूप आनंद झाला.



त्याने झटकन विहिरीत उडी मारली. पाणी पिऊन झाल्यावर कोल्होबा बाहेर येऊ लागला पण त्याला बाहेर येता येईना.

तो घाबरला आता काय करावे? विचार करू लागला. तोच तेथे एक मोठा बोकड आला या बोकडाला पण तहान लागली होती. बोकडाला पाहून कोल्हा म्हणाला.... ''बोकडदादा या आत या! येथे पहा कसे सुंदर नि गोड पाणी आहे ते! या, आत येऊन पाणी प्या.'' बोकडानेही काही विचार न करता एकदम विहिरीत उडी घेतली. बोकड विहिरीत येताच कोल्ह्याने बोकडाच्या पाठीवर उडी मारली नि तेथून तो काठावर आला.



बिचारा बोकड मात्र विहिरीतच अडकून पडला.



Scanned with CamScanner

**तात्पर्य :**

१. भविष्याचा विचार करूनच कोणतेही काम करावे.
२. माणसाने अविचारी असू नये, दूरदृष्टीने वागावे.
३. इतरांच्या गोड बोलण्याला फसू नये.



## अभ्यास

**(अ) खालील वाक्ये चूक की बरोबर ते सांगा.**

**उदा.** कोल्होबाला खूप तहान लागली होती. ...बरोबर...

१. कोल्होबा सगळीकडे पाणी शोधत धावत सुटला. ....................
२. विहिरीत पाणी पाहून कोल्होबाला दु:ख झाले. ....................
३. विहिरीजवळ बोकड आला. ....................
४. बोकडाने विहिरीत उडी मारली नाही. ....................

**(आ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. जंगलातील ओढे, नाले का आटून गेले?

..........................................................................................

२. कोल्हा कशाने व्याकूळ झाला?

..........................................................................................

३. कोल्ह्याने कोणाच्या पाठीवर उडी मारली?


..........................................................................................



Scanned with CamScanner

## १२ बालगीत

# गोड गोड आंबा



गोड गोड असतो आंबा
तुम्हाला हवा का? लवकर सांगा
फळांचा राजा म्हणतात याला
रंग त्याचा आवडतो मला
हापूस आंब्याच्या फोडी खा
पायरीच्या आंब्याचा रस प्या
लंगडा, तोतापुरी, नीलम, रायवळ,
कोणतेही खा गोड गोड फळ

## अभ्यास

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आंबा कसा असतो?

..............................................................................

२. फळांचा राजा कोणाला म्हणतात?

..............................................................................

३. कोणत्या आंब्याच्या फोडी खायच्या?

..............................................................................



Scanned with CamScanner